**<u>वादी तर्फे साक्षीदार १ यांचा पुढील उलटतपास प्र.वादी तर्फे एस.बी.खंजीरे वकील यांचे तर्फे सुरु.</u>**

माझा इचलकरंजी शहराशी कामानिमित्त संपर्क आहे. माझी सध्या बँक ऑफ इंडीया मुख्य शाखा इचलकरंजी व कलप्पान्ना आवाडे जनता सहकारी बँक, मुख्य शाखा, इचलकरंजी येथे बँक खाते आहेत. सदरची बँक खाती मागील आठ ते दहा वर्षापासुन आहेत. तारदाळ मध्ये एक ही बँक नाही. हे खरे आहे की मागील १५ वर्षापासुन तारदाळ मध्ये पतसंस्था आहेत. माझे तारदाळ येथे पंधरा वर्षापुर्वी पतसंस्थेत खाते नाही. साक्षीदार सांगतो मागील पाच वर्षापासुन आहे. दिनांक ११/१०/२०१० रोजी माझे डोंबिवली बँक, शाखा– इचलकरंजी येथे खाते होते व त्या खात्यामधुन मी व्यवहार करत होतो. मी व्यवहार लिखानाच्या वह्या ठेवत नाही.

हे खरे नाही की दिनांक ११/१०/२०१० रोजी माझ्याकडे रोख रक्कम शिल्लक होती हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. दिनांक ११/१०/२०१० रोजी माझ्याकडे रोख रक्कम शिल्लक होती हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला आहे. साक्षीदार प्रकरणातील कागदपत्रे पाहुन तसा कागद हजर केला नाही असे सांगतात. हे खरे नाही की दिनांक ११/१०/२०१० रोजी माझ्याकडे कोणतीही रक्कम रोख स्वरुपात शिल्लक नव्हती. हे खरे नाही की दिनांक ११/१०/२०१० रोजी मी प्रतिवादीला र.रु. १०००००/– रोख दिले आहे हे खोटे सांगत आहे. हे खरे नाही की दिनांक ११/१०/२०१० रोजी प्रतिवादी इचलकरंजी मध्ये आली नाही. हे खरे आहेत की निशाणी ३९ वरील तथाकथीत करारपत्रासोबत कोणतेही कागदपत्र जोडलेले नाहीत. हे खरे नाही की दिनांक ११/१०/२०१० रोजी माझी सरस्वती कट्टी किंवा तथाकथीत साक्षीदार यांची भेट झाली नाही. माहे ११ सन २०१० मध्ये माझ्याकडे स्वताचे चारचाकी वाहन नव्हते. हे खरे नाही की दिनांक ११/१०/२०१० रोजी मुंबईत नि. ३९ प्रमाणे तथाकथीत करार केल्याचे मी खोटे सांगतो.

मी शेती खरेदी विक्रीचा व्यापार मागील चार ते पाच वर्षापासुन करतो. त्या व्यापारा बाबत मी हिशोबाच्या वह्या ठेवलेल्या नाहीत. मी आयकर भरतो. आयकर विवरणपत्र या कामी हजर करण्यासाठी मी तयार आहे. हे खरे नाही की दिनांक ११/१०/२०१० रोजी अगर केव्हाही माझा व प्रतिवादीचा दावा मिळकत विक्रीबाबत कोणताही करार झालेला नाही. हे खरे नाही की मी अॅड. पटवा, सौ.विणा पाटील व इस्माईल पटेल यांनी दिनांक

११/१०/२०१० रोजीचा संगणमत करुन बोगस करारपत्र बनवलेले आहे. हे खरे नाही की मी केव्हाही प्रतिवादीला भेटून दावा मिळकत खरेदी करुन देणेबाबत विचारणा केलेली नाही. हे खरे नाही की ऑगष्ट २०११ मध्ये प्रतिवादी खरेदी खत करुन देतो म्हणाल्याचे मी खोटे सांगतो. हे खरे नाही की त्याकारणाकरीता मी स्टँम्प व डिमांड ड्राफ्ट काढल्याचे खोटे सांगत आहे. हे खरे नाही की प्र.वादी हे दावामिळकत ति–हाईत इसमाला विकत असलेबाबत मी दाव्यामध्ये खोटे नमुद केले आहे. या दाव्यात तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी केलेला अर्ज नामंजुर झाला असुन त्याबाबत मी अपील केलेले नाही. हे खरे नाही की स्टँम्प व डिमांड ड्राफ्ट काढुन ठेवल्याचे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की दिनांक ११/१०/२०१० रोजी कोणतेही तथाकथीत करारपत्र झाले नाही व त्यापासुन मला कोणतेही अधिकार मिळत नाहीत. हे खरे नाही की, प्रतिवादीला दावामिळकतीची देखभाल करण्यासाठी एका इसमाची गरज होती व त्याबाबत त्यांनी माझ्याकडे विनंती केली होती. हे खरे नाही की ऑगष्ट २०१० मध्ये प्रतिवादी मला भेटली व त्यांनी दावा मिळकतीवर कोणी अतिक्रमण करुनये म्हणून त्याचा गैर फायदा घेवून मी हा दावा दाखल केलेला आहे.

हे खरे नाही की दावामिळकतीत प्रतिगुंठा किंमत अडीच ते तिन लाख अशी सन २०१० मध्ये होती. हे खरे नाही की विणा पाटील यांच्याकडून फोटो उपलब्ध करुन ते करारपत्राला बोगस रीत्या चिटकवले आहेत. मी विणा पाटील यांची साक्ष नोंदविणार नाही. हे खरे नाही की प्रतिवादीची मिळकत गिळंकृत करायची म्हणून खोटा दावा दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

**फेरतपास नाही**

**उलटतपास पुर्ण**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

सही/–

**(डॉ.डी.जी.पटवे )**

दिनांक – ०१/११/२०२३ **स.दि.न्या.क.स्तर, इचलकरंजी.**